
समिती दर्पण

ऑक्टोबर २०२६

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org



समितीचे विद्यार्थी, त्यांचे पालक, साहाय्यदाते, हितचिंतक, विश्वस्त, सल्लागार, कार्यकर्ते, कर्मचारी यांना ही दिवाळी आनंदाची, संपन्नतेची आणि आरोग्यमयी जावो, ही प्रार्थना.

प्रतापराव पवार यांनी दिली शिकवण, अनुभवांची शिदोरी

समितीच्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन मिळावे, विविध क्षेत्रांतील अनुभवी व्यक्तींच्या विचारांचा परिचय व्हावा, तसेच विद्यार्थ्यांना आपल्या प्रश्नांवर थेट संवाद साधण्याची संधी मिळावी, या उद्देशाने ३ ऑक्टोबर रोजी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्याबरोबर विशेष संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात झाला. कार्यक्रमास कार्यकर्ते, सर्व वसतिगृहांमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. व्यवस्थापनातील विद्यार्थी, शैक्षणिक प्रगती साधणारे, वेगवेगळ्या उपक्रमांत सहभाग नोंदविणारे विद्यार्थी, विद्यार्थी विकास केंद्र, प्रवेश आदी उपसमितींच्या माध्यमातून वेळ देणारे कार्यकर्ते यांच्याविषयी माहिती देऊन त्यांचे कौतुक केले. त्यानंतर प्रतापराव पवार सरांच्या जीवनप्रवासाबद्दल, सामाजिक कार्याबद्दल प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून त्यांच्याशी संवाद साधला. प्रतापराव पवार यांनी आयुष्यातील विविध अनुभव, प्रसंग आणि आव्हाने विद्यार्थ्यांसमोर मांडली. त्यातून काय शिकलो, त्या शिकवणीचा आपल्या आयुष्यात कसा उपयोग केला आणि त्यातून विद्यार्थ्यांनी काय शिकावे, यावर त्यांनी भर दिला. यावेळी विद्यार्थ्यांनाही श्री. पवार सरांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. शिक्षण, करिअर, व्यक्तिमत्त्व विकास, कार्यक्षेत्रातील अनुभव, भविष्यातील संधी तसेच जीवनातील विविध निर्णयांशी संबंधित प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले.



वाढदिवसाची अनमोल भेट

समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या संकल्पनेतून उद्योजकता विकासाचे बीज समितीत रोवले गेले. नोकरी मागणारे न होता नोकरी देणारे व्हावेत, असा विचार विद्यार्थ्यांसमोर ते सातत्याने मांडतात. गेल्या तीन- चार वर्षात अनेक विद्यार्थ्यांनी यातून प्रेरणा घेत काही ना काही धडपड सुरू केली आहे. या धडपडीतून आणि 'कमवा- शिका' योजनेतून काही विद्यार्थ्यांनी १५ ऑक्टोबरला श्री. पवार सरांच्या वाढदिवशी त्यांना आवडेल अशी भेट दिली. समितीच्या पी. डी. कारखानीस वसतिगृहासमोरील जागेत सुमारे १५ विविध स्टॉल मांडून त्यातून स्वतःच्या उत्पादित वस्तू, कमवा- शिका योजनेतून तयार केलेल्या वस्तू, समिती शेती प्रयोगशाळेतील भाज्या, त्याचबरोबर फराळाचे साहित्य, कोल्ड कॉफी अशांची विक्री केली. याचे उद्घाटन श्री. पवार सरांच्या हस्ते त्या दिवशी झाले. त्यांनी सर्व स्टॉलला भेट देऊन माहिती घेतली, काही सूचना केल्या, त्यातील आर्थिक बाजूही समजून सांगितली. त्यांच्यासाठी ही अनमोल अशी वाढदिवसाची भेट होती.



विद्यार्थ्यांच्या जीवनशैलीत आरोग्याशी संबंधित विविध प्रश्नांवर चर्चा करणे, त्यांना मानसिक ताणतणाव व्यवस्थापन (Stress Management) शिकविणे आणि उत्तम आरोग्याविषयी (Self hygiene) मार्गदर्शन करणे, या अनुषंगाने प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी समितीचे आरोग्य अधिकारी डॉ. अभय व्यवहारे यांनी संवाद साधला. ६ ऑक्टोबर रोजी पुसाळकर हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला.

'आपटे'तील ग्रंथालयाला भोसले दांपत्याचे नाव

समितीच्या डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहातील ग्रंथालयाचे सौ. निवेदिता व श्री. सुभाषचंद्र भोसले ग्रंथालय असे नामकरण समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार याच्या हस्ते १४ ऑक्टोबरला झाले.

यावेळी प्रतापराव पवार म्हणाले, "समितीच्या माजी विद्यार्थ्यांच्या मनात संस्थेविषयी कृतज्ञता आहे. सुभाषचंद्र भोसले यांनी कष्टातून शिक्षण घेत विविध क्षेत्रांत उच्च पदांवर काम केले. निवृत्तीनंतर कार्यकर्ता म्हणून संस्थेला योगदान दिले. त्यांच्या नावाने समितीत ग्रंथालय होत आहे, याचा आनंद आहे. आदर्श नागरिक घडविण्याचे अच्युतरावांचे जे ध्येय होते ते कार्य आपण पुढे नेत आहोत."

यावेळी संभाजीराव भावसार, मधुकर भोसले, इंद्रनील भोसले, शशिकांत नायक आदींनी भावना व्यक्त केल्या. समितीचे विश्वस्त, कार्यकर्ते, भोसले परिवारातील सदस्य, हितचिंतक उपस्थित होते. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी प्रास्ताविक केले, प्रेरणा मालुसरे हिने सूत्रसंचालन केले.



संकेत जगताप, शुभम औटीच्या प्रामाणिकपणाचे कौतुक





समितीतील संकेत जगताप आणि शुभम औटी या विद्यार्थ्यांना वसतिगृहाच्या प्रवेशद्वारासमोर एका व्यक्तीचे १० हजार रुपयांहून अधिक रक्कम असलेले पाकीट सापडले. त्यांनी दुचाकीचा ५०० मीटरहून अधिक अंतरापर्यंत पाठलाग करून एका डिलिव्हरी बॉयच्या मदतीने ते पाकीट संबंधित व्यक्तीपर्यंत सुरक्षित पोहोचवले. ज्यांचे पाकिट होते ती व्यक्ती पोलीस अधिकारी होती. प्रामाणिकपणा आणि संस्कार पाहून त्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले.

पत्रलेखन स्पर्धेतून लेखन कौशल्याला वाव

विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला वाव मिळावा, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी आणि भावनांना शब्दांत व्यक्त करण्याची कला विकसित व्हावी, या उद्देशाने समितीच्या ग्रंथालयामार्फत पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणादिना'चे औचित्य साधून १५ ऑक्टोबरला समितीच्या सर्व वसतिगृहांमध्ये ही स्पर्धा झाली. स्पर्धेत एका प्रज्ञाचक्षू विद्यार्थिनीसह ६८ विद्यार्थी, ७ कार्यकर्ते, ५ कर्मचारी सहभागी झाले. स्पर्धेसाठी 'स्वतःला पत्र', 'समितीला खुले पत्र', 'सीमेवरील सैनिकाला पत्र' असे नाविन्यपूर्ण विषय आयत्या वेळी दिले होते. स्वतःच्या हस्ताक्षरात, ३० मिनिटांच्या मर्यादेत, मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यांपैकी कोणत्याही एका भाषेत पत्र लिहायचे होते. स्पर्धेचे परीक्षण रेखा साठ्ये, अनिता कहाते आणि नंदकुमार देशपांडे हे करीत असून, या स्पर्धेचा निकाल लवकरच घोषित करण्यात येईल.



कष्ट, संस्कार, स्वावलंबनातून घडलेला जीवनप्रवास

तयाचा वेलू...

सुमन सुहास यादव (सुमन किसन तांबे)



बारावीनंतर मी पुढील शिक्षणासाठी पुण्यात आले. ग्रामीण भागातून आल्यामुळे माझ्यासाठी पुणे हे एक नवीन आणि मोठे जग होते. शिक्षणाची ओढ होती, काहीतरी करून दाखवण्याची इच्छा होती; परंतु आर्थिक परिस्थितीची जाणीवही होती. अशा वेळी मला विद्यार्थी साहाय्यक समितीचा आधार मिळाला. माझ्या आयुष्याला योग्य दिशा देणारी, मला घडविणारी ही संस्था ठरली. यामध्ये माझ्या आईवडिलांचा व मोठ्या भावाचा तितकाच महत्त्वाचा वाटा की त्यांनी मला पुण्यासारख्या ठिकाणी शिक्षणासाठी पाठविले.

समितीच्या वसतिगृहात माझी केवळ राहण्याची सोय झाली नाही, तर जीवन जगण्याची शिस्त, स्वावलंबन आणि चांगले संस्कार मिळाले. योगासने अनिवार्य असल्यामुळे नियमितपणा, शरीर- मनाचे आरोग्य आणि शिस्त यांचे महत्त्व समजले. वेळेचे नियोजन, स्वच्छता, साधेपणा, परस्पर सहकार्य आणि जबाबदारीची भावना या सवयी माझ्या आयुष्याचा अविभाज्य घटक बनल्या.

या काळात 'कमवा- शिका' या योजनेने माझ्या जीवनाला वेगळी दिशा दिली. या प्रवासात मृणालिनी चितळे आजींचे योगदान मी कधीही विसरू शकत नाही. त्यांच्याकडे मी 'कमवा व शिका' अंतर्गत लिखाणाचे काम करीत असे. त्यांनी मला शिक्षणासाठी खूप मदत व मार्गदर्शन केले. त्यांच्या मायेचा आणि मदतीचा माझ्या जीवनावर मोठा प्रभाव पडला. त्यांच्या सहकार्यामुळे शिक्षण पूर्ण करण्यासाठी माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

'कमवा आणि शिका'मुळे एक महत्त्वाचा संस्कार मनावर झाला, कष्ट करण्याची लाज वाटू नये. स्वतःच्या शिक्षणासाठी आणि भविष्यासाठी केलेले प्रामाणिक श्रम ही अभिमानाची गोष्ट आहे, हे समजले. समितीच्या कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन माझ्यासाठी अत्यंत मोलाचे ठरले. निर्मलाताई पुरंदरे, गिंडी सर आणि पटवर्धन सर यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन माझ्या जडणघडणीत महत्त्वाचे ठरले. त्यांनी आम्हाला केवळ शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले नाही, तर चांगला माणूस म्हणून घडण्यासाठी प्रेरणा दिली.

वसतिगृहातील पाटकर ताई आणि इतर रेक्टर यांचेही माझ्या जीवनात विशेष स्थान आहे. विद्यार्थिनींच्या छोट्या- मोठ्या अडचणी समजून घेऊन त्या प्रेमाने मार्गदर्शन करीत. शिस्त लावताना त्यामागे असलेली आपुलकी आम्हाला जाणवत असे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक गोष्टी शिकता आल्या. यामुळेच मी शिक्षण घेताना व्हाईस रेक्टरचे काम करू शकले. त्या काळातील मैत्रिणींचाही माझ्या जीवन प्रवासात महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्यामुळे मैत्रीचे आणि सहजीवनाचे महत्त्व समजले. समितीच्या वातावरणाने माझ्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. शिस्त, कष्ट, स्वावलंबन, साधेपणा, सहकार्य आणि माणुसकी या मूल्यांची शिकवण मला येथे मिळाली. पुढे आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर या मूल्यांचा उपयोग झाला. फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए. पूर्ण केले. त्यानंतर एम.एस. डब्ल्यू. केले. समितीचा आधार, 'कमवा आणि शिका' योजनेचा अनुभव, चितळे आजींची मदत आणि अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन यामुळे मी हा प्रवास पूर्ण करू शकले.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर माझ्या आयुष्याचा पुढचा टप्पा महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत सुरू झाला. ज्या संस्थेने स्त्री शिक्षण, स्वावलंबन आणि समाजसेवेचा आदर्श समाजासमोर ठेवला, त्या संस्थेत काम करण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी अभिमानाची आणि कृतज्ञतेची बाब आहे. संस्थेत विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळाली. वसतिगृह प्रमुख म्हणून काम करताना अनेक मुलींशी संवाद साधता आला. त्यांच्या अडचणी समजून घेऊन आधार देता आला. त्यांना मार्गदर्शन करता आले. समितीमध्ये मिळालेले संस्कार आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत काम करताना मिळालेला अनुभव यांची सुंदर सांगड मला आयुष्यात घालता आली

आज मी सेवेतून निवृत्त झाले आहे. खेडेगावातून पुण्यात शिक्षणासाठी आलेली मुलगी, समितीचा आधार मिळालेली विद्यार्थिनी, स्वतःच्या शिक्षणासाठी कष्ट करणारी, मान्यवरांच्या मार्गदर्शनाने पुढे जाणारी, फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए. आणि पुढे एम.एस.डब्ल्यू. करणारी तरुणी आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत विविध जबाबदाऱ्या मनापासून पार पाडणारी कार्यकर्ती, हा संपूर्ण प्रवास माझ्यासाठी अत्यंत समृद्ध करणारा आहे. या प्रवासाने मला एक गोष्ट शिकविली, परिस्थिती कितीही साधी असली तरी शिक्षणाची जिद्द, कष्ट करण्याची तयारी, योग्य संस्कार आणि योग्य व्यक्तींचे मार्गदर्शन मिळाले तर माणूस आयुष्याला सुंदर आकार देऊ शकतो. आज मनात एकच भावना आहे, कृतज्ञता. आणि एकच विश्वास आहे, कष्ट करण्याची लाज बाळगू नका; कारण कष्टातून मिळालेला आत्मविश्वास, शिक्षणातून मिळालेले ज्ञान आणि माणसांकडून मिळालेली माया हीच आयुष्याची खरी कमाई आहे.



समितीच्या कार्याचा परिचय

समितीत प्रथमच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी १० ऑक्टोबरला श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृहात परिचय सभेचे आयोजन केले होते. यावेळी सुमारे २०० विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते. या सर्वांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत करण्यात आले

समितीचे कार्य, उद्दिष्ट आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती नवीन विद्यार्थ्यांना यावेळी देण्यात आली. प्रभाकर पाटील, तुषार रंजनकर, चंद्रकांत कुलकर्णी, हरीश अष्टेकर आणि अजित गटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्रभाकर पाटील यांनी समितीचे कार्य, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी समितीच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या संधींचे महत्त्व विशद केले. तसेच

समितीच्या कार्यकर्त्यांची ओळख करून दिली. तुषार रंजनकर यांनी वसतिगृहातील शिस्त, नियम आणि जबाबदाऱ्यांविषयी मार्गदर्शन केले. Digitech and deepentra या संस्थांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या संधीची माहिती दिली. चंद्रकांत कुलकर्णी यांनी पाल्य- पालक योजना, देणगीदारांच्या संस्थेविषयीच्या भावना, तसेच त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मदतीबाबत सामाजिक जाणीव ठेवण्याविषयी मार्गदर्शन केले. दिवाळी निधी योजनेची माहिती दिली. हरीश अष्टेकर यांनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी आत्मविश्वास, सहकार्यभावना आणि नेतृत्वगुण यांचे महत्त्व अधोरेखित केले. अजित गटे यांनी रोबोटिक्स, आयओटी या विषयांची माहिती दिली.

परिचय सभेमुळे विद्यार्थ्यांना समितीच्या कार्याची ओळख झाली. वसतिगृहातील वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी आणि विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले. यावेळी सर्व पर्यवेक्षक उपस्थित होते.



शीला मनोहर आपटे, विजया जयंत देशपांडे, शैलजा अरुण फाटक व प्रसाद गोविंद परांजपे यांनी त्यांची आई कै. नलिनी गोविंद परांजपे यांच्या स्मरणार्थ पुण्यातील मुलींच्या नवीन वसतिगृहातील एका खोलीसाठी देणगी दिली. या खोलीचे उद्घाटन त्यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते १५ ऑक्टोबरला करण्यात आले.



'युवा मैत्री'तून भावनिक आरोग्याची जाणीव

विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आणि भावनिक आरोग्याची जाणीव वाढविण्यासाठी 'युवा मैत्री– Student Well-being Session' या विषयावर मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले होते. डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहात ५ ऑक्टोबरला डॉ. गीतांजली जाधव यांनी हे सत्र घेतले. सुरुवातीला त्यांनी 'वादळ आलं, वारा आला' हा मजेदार खेळ घेतला. त्यानंतर विद्यार्थिनींना गटांमध्ये विभागून देहबोली (body language), हातपायांच्या हालचाली आणि टीमवर्कचा वापर करून एक शब्द तयार करण्याचा टास्क देण्यात आला. या दोन्ही ॲक्टिव्हिटीमुळे सुरुवातीपासूनच विद्यार्थिनींचा सहभाग वाढला. त्यानंतर डॉ. जाधव यांनी आपल्या मनाची आणि भावनांची काळजी घेणे, दैनंदिन जीवनातील ताणतणाव ओळखणे आणि तो योग्य पद्धतीने कमी करणे याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी झोप, व्यायाम, मनःस्थिती, Dopamine hormone आणि आपल्या सवयींचा आरोग्यावर होणारा परिणाम याबद्दल सोप्या उदाहरणांमधून माहिती दिली. कोणत्याही परिस्थितीत लगेच प्रतिक्रिया न देता शांतपणे विचार करून योग्य निर्णय घेण्याचे महत्त्व समजावून सांगितले. मनातील ताण आणि भावना वेळेत व्यक्त न केल्यास पुढे त्याचा त्रास वाढू शकतो. भावनिक स्थितीचा अंदाज घेण्यासाठी Green, Yellow आणि Red signal ही संकल्पना सांगितली. शेवटी सर्व विद्यार्थिनींसाठी एक छोटी रिलॅक्सेशन ॲक्टिव्हिटी घेतली. या सत्रातून विद्यार्थिनींना स्वतःच्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्याची काळजी घेणे, ताण योग्य वेळी व्यक्त करणे, स्वतःसाठी वेळ देणे यांचे महत्त्व समजले.

नाते दृढ करण्याचा माजी विद्यार्थीनींचा निर्धार

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थिनींचा मेळावा ४ ऑक्टोबर रोजी लतिका गायतोंडे वसतिगृहात झाला.

माजी विद्यार्थी मंडळाच्या सचिव मनीषा गोसावी यांनी प्रास्ताविक केले. तीन वर्षांपूर्वी सुरू केलेली भिशी आजही अखंड सुरू असून, तिच्या माध्यमातून माजी विद्यार्थिनी समितीशी जोडल्या जात असल्याचे त्यांनी नमूद केले. माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे यांनी मंडळाच्या वर्षभरातील उपक्रमांची माहिती देत रक्षाबंधन, दिवाळी फराळ आदी उपक्रमांमध्ये माजी विद्यार्थीनींनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. तांबोळी सरांच्या प्रेरणेने पाच कोटी रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यश आले, याचा विशेष उल्लेख केला. ग्रामीण भागात समितीच्या कार्याची माहिती पोहोचविणारे सेंटर पुन्हा कार्यान्वित करण्याचा मानस व्यक्त केला.

कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी समितीच्या सद्यस्थितीतील उपक्रमांची तसेच भविष्यातील योजनांची माहिती दिली. यावेळी ॲड. प्रार्थना सदावर्ते, उज्ज्वला बापट, रश्मी गांधी, गायत्री पाठक आणि स्नेहा फडके यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणाऱ्या माजी विद्यार्थिनींचा व माजी पर्यवेक्षिका उज्ज्वला माटे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन सुवर्णा काळडोके आणि प्रतीक्षा ढवळे यांनी केले. आभार सुनीता पाटील यांनी मानले.



समिती वृत्त




विद्यार्थिनींनी लुटला भोंडला, गरब्याचा आनंद

विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने १४ ऑक्टोबरला सुमित्रा सदन वसतिगृहात विद्यार्थिनींसाठी पारंपरिक भोंडला आयोजित केला होता. महाराष्ट्रातील भोंडल्याची परंपरा जपणे आणि एकत्रितपणे सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी देणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

समृद्धीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या गजपूजनाने भोंडल्याची सुरूवात झाली. सर्व विद्यार्थिनींनी एकत्र येऊन गणेशपूजन केले. भोंडल्याची परंपरा, तिचे स्वरूप आणि सांस्कृतिक महत्त्व याविषयी विद्यार्थिनींना यावेळी माहिती देण्यात आली. भोंडल्याची पारंपरिक गाणी म्हणत विद्यार्थिनींनी फेर धरला. त्यानंतर त्यांनी गरबा नृत्य केले. या उपक्रमात सुमारे ८० मुली सहभागी झाल्या. कार्यक्रमात शेवटी सर्व विद्यार्थिनींना खिरापत वाटण्यात आली.

चौधरी वसतिगृहात अवांतर वाचन उपक्रम


अहिल्यानगरमधील कै. म. कृ. ऊर्फ मधुभाऊ चौधरी वसतिगृहात ११ ऑक्टोबरला विद्यार्थिनींसाठी अवांतर वाचन उपक्रम घेण्यात आला. यात ३६ मुलींनी सहभाग घेतला. अवांतर वाचनामुळे ज्ञान वाढते, नवीन गोष्टी शिकायला मिळतात आणि विचार करण्याची क्षमता विकसित होते, तसेच शब्दसंग्रह वाढतो, भाषेवर प्रभुत्व मिळते, कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे या उपक्रमाचे वेगळे महत्व असल्याचे पर्यवेक्षिका रोहिणी भनगडे यांनी विद्यार्थिनींना सांगितले.



विद्यार्थी साहाय्यक समितीचा २०२५-२०२६ चा वार्षिक अहवाल नुकताच प्रकाशित झाला. तो सर्व देणगीदार, हितचिंतकांना पाठविण्यात आला.

पुस्तकांच्या जगात...

एका आईचा संघर्ष



नॉट विदाऊट माय डॉटर या पुस्तकात बेट्टी मेहमुदी यांनी आपल्या जीवनातील संघर्ष प्रभावीपणे मांडला आहे. त्यांचा पती त्यांना फसवून इराणला घेऊन जातो, तेथे त्यांचा मानसिक व शारीरिक छळ होतो. मात्र तरीही हार न मानता त्या आपल्या छोट्या मुलीसह इराणमधून अमेरिकेला कशा येतात, त्यासाठी त्यांना कोणकोणत्या संकटांना तोंड द्यावे लागते, याचे कथन पुस्तकात आहे. त्यांचे धाडस, चिकाटी याबरोबरच मुलीवरील निस्सीम प्रेम याची जाणीव होते. कोणत्याही कठीण परिस्थितीत आशा सोडू नये, धैर्याने निर्णय घ्यावेत, स्वातंत्र्याचे महत्त्व ओळखावे, असा संदेश हे पुस्तक देते.

पुस्तकाचे नाव- नॉट विदाऊट माय डॉटर
लेखक- बेट्टी मेहमुदी, विल्यम हॉफर

- धनश्री जंजीरे, द्वितीय वर्ष, बीए एलएलबी

राजगड ट्रेकदरम्यान इतिहासाची उजळणी

समितीच्या विद्यार्थ्यांचा १८ ऑक्टोबरला राजगड ट्रेक आयोजित केला होता. यामध्ये ५१ विद्यार्थी सहभागी झाले. त्यात २९ मुली होत्या.

प्रवासाची सुरुवात शिवरायांची गाणी गात, हसतखेळत झाली. माजी विद्यार्थी संतोष घारे यांनी नाश्त्याची व जेवणाची सोय हॉटेलमध्ये केली होती. राजगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाली गावातून ट्रेकला सुरुवात झाली. गडावर गर्दी असल्याने सर्वांना एकत्र राहणे अशक्य होते म्हणून गटप्रमुख निवडून आणि त्यांच्याकडे १०-१० विद्यार्थ्यांची जबाबदारी देण्यात आली होती. पर्यवेक्षक राजेश्वर पोहरे, शीतल शिंदे, कार्यकर्ते निसार चौगुले यांनी शिस्तबद्ध रचना करून चढाईचे नियोजन केले. अतिगर्दीमुळे बालेकिल्ल्याची वाट बंद करण्यात आली होती. त्यामुळे एका खडतर वाटेने सुवेळा माचीच्या दिशेने जाऊन नेढे, हत्ती प्रस्तर, बिनीचा बुरुज आणि झुंजार बुरुज पाहिला. पद्मावती माचीवर पद्मावती मंदिरात दर्शन घेतले. गडभ्रमंती दरम्यान ऐतिहासिक वास्तू आणि प्रसंगांची उजळणी झाली.





विद्यार्थ्यांकडून ज्येष्ठांना तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन

ज्येष्ठ नागरिकांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी आणि त्यांनी मोबाईल व डिजिटल सुविधांचा आत्मविश्वासाने वापर करावा, या उद्देशाने साहाय्यदाते पराग परांजपे यांच्या कल्पनेतून समितीतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत तंत्रज्ञान जागरूकता वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. १५ ऑक्टोबरला झालेल्या या वर्गात सुमारे २० ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला.

या वर्गात ज्येष्ठांना मोबाईलमधील मूलभूत गोष्टी समजावून सांगण्याबरोबरच विविध सुविधांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. मोबाईल वापरणे, आवश्यक पर्याय शोधणे, इंटरनेटचा वापर करणे, तसेच दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरणाऱ्या डिजिटल सुविधांची माहिती देण्यात आली. यावेळी पराग परांजपे, चंद्रकांत कुलकर्णी, तुषार रंजनकर, डॉ. प्रसाद आंबीकर आणि दीपाली कुलकर्णी आदी उपस्थित होते. समितीच्या चार विद्यार्थ्यांनी आणि सात विद्यार्थिनींनी ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले. 'तंत्रज्ञानाची भीती नको, तंत्रज्ञानाशी मैत्री करा!' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

मसाला दूध, गप्पांच्या मैफिलीने रंगली कोजागरीची रात्र



शरद ऋतूतील पौर्णिमेची प्रसन्न रात्र, शीतल चंद्रप्रकाश आणि गरम मसाला दुधाचा आस्वाद घेत झालेल्या गप्पा, हास्यविनोद अशा वातावरणात समितीच्या विद्यार्थ्यांनी कोजागरी साजरी केली.

एकत्र येणे, आनंद वाटणे आणि आपुलकीची नाती दृढ करणे, ही कोजागरीची सुंदर परंपरा आहे. याच भावनेतून वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये एकोपा वाढावा, परस्पर संवाद दृढ व्हावा आणि बंधुभाव वृद्धिंगत व्हावा, या उद्देशाने विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ही पौर्णिमेची रात्र साजरी केली. यावेळी पर्यवेक्षक, विद्यार्थी प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता केली.

राज्य स्पर्धेत सहभागाची चार विद्यार्थिनींना संधी



अहिल्यानगरमधील कै. म. कृ. ऊर्फ मधुभाऊ चौधरी वसतिगृहातील ज्ञानेश्वरी शिरसाठ, दीक्षा बांदल, प्रतिक्षा गर्जे आणि अनुष्का काकडे या विद्यार्थिनींना 'कोड क्राफ्ट २०२६' या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेण्याची संधी मिळाली. ही स्पर्धा लोणी (जि. अहिल्यानगर) येथील प्रवरा रुरल कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग येथे आयोजित करण्यात आली होती.

या विद्यार्थिनींनी त्यांच्या गटाला 'उडान' नाव दिले होते. स्पर्धेच्या तीन फेऱ्या होत्या. पहिल्या फेरीत संघांना त्यांच्या कल्पनेवर आधारित पीपीटी सादर करायची होती. सुमारे हजार सहभागींपैकी त्यातून शंभर संघांची निवड होणार होती. उडान टीमला या फेरीत ९४ वा क्रमांक मिळाला. पुढील फेरीत कल्पना आणि प्रकल्पाची संकल्पना सादर करणे अपेक्षित होते. या फेरीत 'उडान'ला दुसरे स्थान मिळाले. अंतिम फेरी चोवीस तासांची होती. या मर्यादित वेळेत प्रकल्प पूर्ण करणे गरजेचे होते. काही तांत्रिक अडचणींमुळे अपेक्षित यश मिळविता आले नाही. तरीही स्वतःला नव्याने ओळखणे, संवादकौशल्य सुधारणे, आत्मविश्वास वाढणे आणि संघभावनेचे महत्त्व मुलींच्या लक्षात आले.